**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय :- भिवंडी पुर्व मतदार संघात विविध ठिकाणी बस थांबा बनविणे.**

भिवंडी पुर्व मतदार संघात विविध ठिकाणी बस थांबा बनविणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५९,९८,०५८/- मात्रच्या प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक ०३/०८/२०२३ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन त्यानुसार क्र./नवि/टे-४/भिनिशमनपा/मुलभुत/प्र.मा/एस.आर-२३९/२०२३ दि.२६/१०/२०२३ नुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे,यांचे कडुन प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ५९,९८,०५८/- २ रे कॉल ई-निविदा सुचना क्र.१३३/२०२३-२४ (९७५५२२) दि.२७/१२/२०२३ रोजी दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.०२/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण ४ निविदा प्राप्त झाल्या आहेत त्यापैकी मे.हरी ओम इंटरप्रायजेस यांनी जोडलेली बीड कॅपेसिटी ही मुदतीत नसल्यामुळे त्यांना निविदा समितीने अपात्र ठरविले आहे. उर्वरित एकुण ३ निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | **मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०१० % कमी दराने** |
| २ | मे. बुबेरे अँण्ड असोशिएट्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ३ | मे.ओमकार इंजिनिअर्स अँण्ड कॉन्स्ट्रक्टर्स | अंदाजपत्रकीय दराने |

वरील पैकी **मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस**, यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा १.०१० % कमी दराची म्हणजेच रक्कम रु.५९,३७,४७७/- (अक्षरी एकोणसाठ लाख सदतीस हजार चारशे सत्याहत्तर मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- ३६१ दिनांक :- १६/०२/२०२४

**मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस**, यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा १.०१० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.५९,३७,४७७/- (अक्षरी एकोणसाठ लाख सदतीस हजार चारशे सत्याहत्तर मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी पुर्व मतदार संघात विविध ठिकाणी बस थांबा बनविणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकार हिमालय मनोहर पाटील यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना**

**विषय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत करावयाच्या विकास कामांच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यतेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मागाास वर्गीय वस्तीमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत मा.ना.श्री.कपिल मोरेश्वर पाटील, राज्य मंत्री, पंचायत राज मंत्रालय भारत सरकार, यांनी दि.२० नोव्हेंबर २०२३ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, ठाणे यांच्याकडे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत ८ विकास कामांना मंजूरी देऊन रक्कम रुपये ८९,९६,५२९/- निधी उपलब्ध करुन देण्याची मगाणी केली असून सहाय्यक आयुक्त समाज कल्याण , ठाणे यांनी मा. श्री. सुभाष माने जिल्हा प्रमुख शिवसेना यांनी प्रस्तावित केलेल्या ८ विकास कामांना निधी देणेकामी शासन निर्णयानुसार अटी व शर्तीची पुर्तता पूर्ण करीत असून रु. ८९,९६,५२९/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत. त्यास शहर अभियंता, मुख्यलेखा परिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी, अतिरिक्त आयुक्त यांची शिफारस आहे.

शासन आदेश क्र. एमसीओ. २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४. दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी मा.प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार सदरच्या प्रस्तावास मंजुरी करण्याचा करण्याचे अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना आहेत. त्यानुसार सदरच्या खालील प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेकरीता पाठवावयाची असल्याने त्यास मंजुरी मिळणेकामी सादर.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | भिवंडी मनपा वार्ड क्र.१६ फुलेनगर -२ बौध्द विहार ते आसबीबी रस्त्यापर्यंत गटार व पायवाट तयार करणे. | ९९९८५४ |
| २ | भिवंडी मनपा वार्ड क्र.१६ फुलेनगर -२ जे.जे. गुप्ता शाळेजवळ गटार व पायवाट तयार करणे. | ९९९७९४ |
| ३ | भिवंडी मनपा वार्ड क्र.१६ फुलेनगर -२ येथे जयराम डोळस यांचे घराजवळ गटार व पायवाट तयार करणे. | ९९९९१३ |
| ४ | भिवंडी मनपा धामणकरनाका जवळील भैय्यासाहेब आंबेडकर येथे गटार व पायवाट तयार करणे. | १९९९३४८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका वार्ड क्र.२० अ रोहीदास नगर येथे गटार व पायवाट बनविणे. | ९९९४३७ |
| ६ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका वार्ड क्र.२० अ बंजारा नगर येथे गटार व पायवाट बनविणे. | ९९९५५५ |
| ७ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका वार्ड क्र.२० अ एकता नगर येथे गटार व पायवाट बनविणे. | ९९९४९६ |
| ८ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका वार्ड क्र.२० अ साठेनगर येथे गाटर व पायवाट बनविणे. | ९९९१३२ |
| **एकुण रक्कम रुपये** | | ८९९६५२९ |

**ठराव क्र.** ३६२ **दिनांक :-**२० /०२/२०२४

मा.ना.श्री.कपिल मोरेश्वर पाटील, राज्य मंत्री, पंचायत राज मंत्रालय भारत सरकार, यांनी दि.२० नोव्हेंबर २०२३ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे यांच्याकडे उपरोक्त सादर केलेली एकुण ८ विकास कामे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेच्या निकषात बसत असून उपरोक्त नमूद कामाची निकड लक्षात घेता सदर योजने अंतर्गत विकास कामे करणेकामी विभागाने शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एम.सी.ओ.२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि- १४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिनिशमनपा उपरोक्त नमूद ८ प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे प्रशासकीय मंजुरी करीता पाठविणेस मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

प्रस्तावना

**विषय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत करावयाच्या विकास कामांच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यतेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मागाास वर्गीय वस्तीमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत मा.श्री. सुभाष माने, जिल्हा प्रमुख शिवसेना यांनी दि.२४/१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, ठाणे यांच्याकडे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत २४ विकास कामांना मंजूरी देऊन रक्कम रुपये ११,३३,५८,६६६/- निधी उपलब्ध करुन देण्याची मगाणी केली असून सहाय्यक आयुक्त समाज कल्याण , ठाणे यांनी मा. श्री. सुभाष माने जिल्हा प्रमुख शिवसेना यांनी प्रस्तावित केलेल्या २४ विकास कामांना निधी देणेकामी शासन निर्णयानुसार अटी व शर्तीची पुर्तता पूर्ण करीत असून रु. ११,३३,५८,६६६/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत. त्यास शहर अभियंता, मुख्यलेखा परिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी, अतिरिक्त आयुक्त यांची शिफारस आहे.

शासन आदेश क्र. एमसीओ. २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४. दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी मा.प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार सदरच्या प्रस्तावास मंजुरी करण्याचा करण्याचे अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना आहेत. त्यानुसार सदरच्या खालील प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेकरीता पाठवावयाची असल्याने त्यास मंजुरी मिळणेकामी सादर.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, हद्दीतील वार्ड क्र.१० मध्ये संघमित्रनगर येथे गटार व पायवाट तयार करणे. | २४९९५३३ |
| २ | वार्ड क्र.१४ मध्ये सहयोग नगर दलितवस्ती करिता गटार व पाथवेज तयार करणे. | २४८९६१९ |
| ३ | वार्ड क्र.१४ मध्ये गोविंदनगर दलितवस्ती करिता गटार व पाथवेज तयार करणे. | २४९८१५९ |
| ४ | वार्ड क्र.१६ फुलेनगर २ प्रेम नगर येथे स्ट्रिटलाईट बसविणे. | २४९८५३१ |

| | | |
|---|---|---|
| ५ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र.१६ फुलेनगर -२ येथे पाण्याची लाईन टाकणे व क्रॉक्रीट रस्ता बनविणे बाबत. | २४९६४२५ |
| ६ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.१६ मध्ये फुलेनगर -२ येथे गटर बनविणे. | २४९६७३७ |
| ७ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.१६ मध्ये प्रेमनगर येथिल फुलेनगर -२ येथे गटार बनविणे. | २४९७४९० |
| ८ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.१६ मध्ये फुलेगनर -२ प्रेमनगर येथे पायवाट तयार करणे. | २४९९०५८ |
| ९ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.१७ मध्ये वॉटर सप्लाय कॉलनी येथे गटर व पायवाट तयार करणे. | २४९७४१७ |
| १० | भिवंडी शहरातील वार्ड क्र.१७ मध्ये वॉटर सप्लाय कॉलनी येथे संरक्षण भिंत व स्ट्रिट लाईट बसविणे. | ५४२३८३६ |
| ११ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, हद्दीतील वार्ड क्र.३ गायत्रीनगर मधील नणावरे यांच्या घरापासून ते घोडके यांच्या घरपासून ते घोडके यांच्या घरापर्यंत गटर व पायवाट तयार करणे. | २४९९५४६ |
| १२ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.१७ मध्ये वॉटर सप्लाय कॉलनी येथे क्रॉक्रीट रस्ता बनविणे. | २४९८७४० |
| १३ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.१४ मधील संयोग नगर येथे पाण्याची लाईन बसविणे. | १९९६१७० |
| १४ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.२० मध्ये साठेनगर येथे व्यायाम शाळा बांधणे व व्यायाम साहित्य बसविणे. | ५६३९६४८ |
| १५ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.२० मध्ये साठेनगर येथे संरक्षण भिंत बनविणे, ओपन जीम, खेळण्याचे साहित्य व बेंचेस बसविणे. | ३७८७६०८ |
| १६ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.२० मध्ये साठेनगर येथे कमान गेट बनविणे व पायवाट तयार करणे. | २९९८२५३ |
| १७ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.२१ मध्ये कैलास नगर येथे व्यायाम शाळा बांधणे. | ५६४०४८० |
| १८ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.२१ मध्ये कैलास नगर येथे गटर व पायवाट तयार करणे. | २४९३५१४ |
| १९ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.१६ मधील फुलेनगर -२ येथे सोपान मस्के यांचे घरापासून ते मानसरोवर रोड पर्यंत सी.सी. रस्ता व गटार तयार करणे. | ३०१६५४१ |
| २० | भिवंडी शहारतील वर्ड क्र.१६ मध्ये नवजीवन कॉलनी येथे पाण्याची लाईन बसविणे. | २४८९७१४ |
| २१ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.१६ मध्ये फुलेगनर -२ येथे मुख्य रस्तायलगत नाला तयार करणे. | २९९८११४५ |

| | | |
|---|---|---|
| २२ | वार्ड क्र.१४ मध्ये सहयोग नगर दलितवस्ती करिता आर.सी.सी पोहच रस्ता तयार करणे. | ९९२५००२ |
| २३ | वार्ड क्र.१४ मध्ये गोविंदनगर दलितवस्ती करिता आर.सी.सी. पोहच रस्ता तयार करणे. | ९९९६०७४ |
| २४ | भिवंडी शहरातील विविध ठिकाणी लोखंडी बेंचेस बसविणे. | २४९९४२६ |
| | **एकुण रक्कम रुपये** | ११,३३,५८,६६६/- |

**ठराव क्र.** ३६३ **दिनांक :-** २० /०२/२०२४

मा.श्री. सुभाष माने, जिल्हा प्रमुख शिवसेना यांनी दि.२४/१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे यांच्याकडे उपरोक्त सादर केलेली एकुण २४ विकास कामे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेच्या निकषात बसत असून उपरोक्त नमूद कामाची निकड लक्षात घेता सदर योजने अंतर्गत विकास कामे करणेकामी विभागाने शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एम.सी.ओ.२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि- १४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिनिशमनपा उपरोक्त नमूद २४ प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे प्रशासकीय मंजुरी करीता पाठविणेस मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना**

**विषय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत करावयाच्या विकास कामांच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यतेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मागास वर्गीय वस्तीमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत माजी.नगरसेविका श्रीमती. क्षमा मनोज ठाकुर यांनी दि.२१/९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत २ विकास कामांना मंजूरी देऊन रक्कम रुपये १,२४,७५,३६४/-निधी उपलब्ध करुन देण्याची मगाणी केली आहे. श्रीमती. क्षमा मनोज ठाकुर यांनी प्रस्तावित केलेल्या २ विकास कामांना निधी देणेकामी शासन निर्णयानुसार अटी व शर्तीची पुर्तता पूर्ण करीत असून रु. १,२४,७५,३६४/-अंदाजपत्रकीय रक्कमेचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत. त्यास शहर अभियंता, मुख्यलेखा परिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी, अतिरिक्त आयुक्त यांची शिफारस आहे.

शासन आदेश क्र. एमसीओ. २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४. दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी मा.प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार सदरच्या प्रस्तावास मंजुरी करण्याचा करण्याचे अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना आहेत. त्यानुसार सदरच्या खालील प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेकरीता पाठवावयाची असल्याने त्यास मंजुरी मिळणेकामी सादर.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.१६ नवजीवन कॅालनी येथे अरुन गायकवाड यांचे घर ते रमेश मोरे यांचे घरापर्यंत परिसरातील विविध ठिकाणी नवीन गटार तयार करणे. | २४९८२१९ |
| २ | वार्ड क्र.१६ नवजीवन कॅालनी येथे पोलिस चौकी मागे योगेश गायकवाड यांचे घरामागे व सुखलाल लोंढे यांचे घरासमोर मोठा नाला तयार करणे बाबत. | ९९७७१४५ |
| | **एकुण रक्कम रुपये** | १,२४,७५,३६४/- |

ठराव क्र. ३६४ दिनांक :-२० /०२ /२०२४

श्रीमती. क्षमा मनोज ठाकुर, यांनी दि.२१/९/२०२३ रोजीच्या भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेकडे सादर केलेली एकुण २ विकास कामे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेच्या निकषात बसत असून उपरोक्त नमूद कामाची निकड लक्षात घेता सदर योजने अंतर्गत विकास कामे करणेकामी विभागाने शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एम.सी.ओ.२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि- १४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिनिशमनपा उपरोक्त नमूद २ प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे प्रशासकीय मंजुरी करीता पाठविणेस मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय —नाले व गटार यांची निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त साो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.३१/०१/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम | दि. ३१/०१/२०२४ पर्यंतची शिल्लक | शेरा (मुळ तरतूद + पुनर्विनियोजनाने घेतलेली तरतूद सह तरतूद रक्कम) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाले व गटार यांची निगा व दुरुस्ती | रु. २६२.०० लक्ष | रु. २६२.०० लक्ष | रु.०.० लक्ष | (२५०.००+१२.०० = २६२.०० लक्ष) |
| | एकूण | रु. २६२.०० लक्ष | रु. २६२.०० लक्ष | रु.०.० लक्ष | |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामधील नाले व गटार यांची निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षामधील निधी संपलेला आहे. खालील काम करणे आवश्यक असल्याने. सदर कामाचे अंदाजपत्रक रु.४,९८,५१५/- इतक्या रक्कमेचे आहे. मात्र नाले व गटार यांची निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक नसल्यामुळे इतर लेखाशिर्षकामधून पुनर्विनियोजन करुन निधी उपलब्ध करणेकामी मा.आयुक्त साो. यांनी मंजूरी दिलेलीआहे. तरी खालील कामाकरीता वरील लेखाशिर्षामध्ये "त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण" या लेखाशिर्षामधुन रु. ४,९८,५१५/- लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्रमांक ०१ अंतर्गत वार्ड क्र.२ अ मधिल आसिफ कंम्पाऊंड येथील सर्फराज अंन्सारी यांचे घर नं.१४८/१ पासून ते सार्व.शौचालय पर्यत व विविध ठिकाणी गटर, पाथवेज दुरुस्ती करणे. | रु. ४,९८,५१५/- | |
| एकूण | रु. ४,९८,५१५/- | |

खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि. ३१/०१/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम पुनर्विनियोजनाच्या रक्कमेसह | दि. ३१/०१/२०२४ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण | रु.५०.०० लक्ष | रु.२६.६४ लक्ष | रु.२६.३६ लक्ष | रु.४.९९ लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांच्याकडे निहीत आहेत.

प्रभाग समिती क्रमांक ०१ अंतर्गत वार्ड क्र.२ अ मधिल आसिफ कंम्पाऊंड येथील सर्फराज अंन्सारी यांचे घर नं.१४८/१ पासून ते सार्व.शौचालय पर्यत व विविध ठिकाणी गटर, पाथवेज दुरुस्ती करणे. विषयांकित काम करणे आवश्यक असल्यामुळे पुर्नविनियोजन करणेकामी कनिष्ठ अभियंता, प्रभाग समिती क्र.१ यांनी मुळ संचिकेसह प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांनी देखील मंजूरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने नाले व गटार यांची निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये "त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण " या लेखाशिर्षामधून रु.४.९९ लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास दिनांक / /२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ३६५

**दिनांक** २० /०२/२०२४

प्रभाग समिती क्रमांक ०१ अंतर्गत वार्ड क्र.२ अ मधिल आसिफ कंम्पाऊंड येथील सर्फराज अंन्सारी यांचे घर नं.१४८/१ पासून ते सार्व.शौचालय पर्यत व विविध ठिकाणी गटर, पाथवेज दुरुस्ती करणेबाबतचे काम करणे गरजेचे असल्याने नाले व गटार यांची निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये तरतुद (निधी) शिल्लक नसल्यामूळे "त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण" या लेखाशिर्षामधून एकूण रु.४.९९ लक्ष रुपयाचे नाले व गटार यांची निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**